# बदलत्या तंत्रज्ञानाने अधिकाधिक लेखक, साहित्यिक निर्माण होतील

**सातारा, दि. ८ (प्राचार्य शिवाजीराव भोसलेनगर) : बदलत्या तंत्रज्ञानाने व माध्यमांद्वारे आपले साहित्य इतरांपर्यंत पोहचवले तर वाचन संस्कृती वाढेल. त्यातून अधिकाधिक लेखक, साहित्यिक निर्माण होतील तसेच बदलत्या तंत्रज्ञानाने आगामी दहा-वीस वर्षांत मुलांचे दफ्तराचे ओझे कमी होईल, असे मूळचे भारतीय पण सध्या अमेरिकास्थित मंदार जोगळेकर यांनी उपस्थितांना पटवून दिले.**

येथील जिल्हा परिषदेच्या मैदानावर १२ व्या जिल्हा ग्रंथ महोत्सवात शनिवारी वाचन संस्कृतीची बदलती माध्यमे 'पुस्तकाकडून ई-बुक'कडे याविषयी उपस्थितांना माहिती देताना ते बोलत होते. यावेळी योगेश सोमण, जिल्हा उपनिबंधक अरुण काकडे उपस्थित होते.

मंदार जोगळेकर पुढे म्हणाले, रत्नागिरी येथे साखरपा गावात रयत शिक्षण संस्थेत दहावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर पुढील शिक्षण पुण्यात घेवून सध्या अमेरिकेत स्थायिक झालो आहे. संगणकावर एखादे पुस्तक डाऊनलोड केले तर ते सर्व जगभर वाचता येते. अशी पुस्तके कमी किमतीत विकतसुद्धा मिळतात. यातील व्यवहार चोख आणि पारदर्शक असतात.

प्रारंभी जोगळेकर यांनी उपस्थित मुलांना प्रश्नोत्तराद्वारे हसत-खेळत पूर्वीची शाळेची दगडी पाटी आणि आता अमेरिकेत वापरत असलेल्या संगणकीय पाटीचे महत्व पटवून दिले. तसेच 'वाचाल तर वाचाल' हा कानमंत्रही दिला. या संगणकीय पाटीवर आपण अमर्याद लिहू शकतो. पुस्तके तयार करू शकतो. मुलांनी निबंध लिहून ते आपापल्या शाळेतील शिक्षकांकडे द्यावेत, ई-मेलने हे निबंध माझ्यापर्यंत पोहचतील. एक वेगळा उपक्रम म्हणून जगभर ई-बुकच्या माध्यमातून ते पोहचवू, असे जोगळेकर यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, बुकगंगा डॉटकॉमच्या माध्यमातून भारतीय पुस्तके वाचायला मिळतात. कोणतेही पुस्तक संगणकावर वाचणे म्हणजे ई-बुक होय. यामुळे सर्व जगभर हे पुस्तक पोहचते. ई-बुकमुळे आगामी १० ते २० वर्षांत दफ्तराचे ओझे पूर्णपणे कमी होऊन विद्यार्थी फक्त या संगणकीय पाटीचा उपयोग करतील. तसेच पुस्तकांच्या छपाईसाठी लागणाऱ्या कागदासाठी होणारी वृक्षतोडही कमी होईल. त्यानंतर त्यांनी निबंध लिहिणाऱ्या पहिल्या १०० मुलांना १०१ रुपयांचे बक्षीस जाहीर केले तसेच पहिल्या उत्कृष्ट निबंधास ५ हजार रुपये, दुसऱ्या निबंधास ३ हजार व तिसऱ्या निबंधास २ हजार रुपये अशी बक्षिसेही जाहीर केली. जि. प. शिक्षणाधिकारी एम. के. गोंधळी, प्रकाश पारखी, कल्पना गौरे यांनी 'पपेट मिमिक्री' हा बाहुल्यांचा कार्यक्रम सादर करून या कार्यक्रमाची सांगता झाली.



**'पुस्तकाकडून ई-बुक'कडे याविषयी माहिती देताना मंदार जोगळेकर, योगेश सोमण.** (रिजवान सय्यद)